# महासागर नागपूर

## पान ३ ऑरेंज सिटी

शनिवार, दिनांक १५ एप्रिल २०२३


## 'अध्यात्मातून प्रशासनातील उत्कृष्टता' या विषयावर परिषदेचे आयोजन

**नागपूर, दि. १४एप्रिल :** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय आणि राजयोग एज्युकेशन अँड रिसर्च फाऊंडेशनचा प्रशासकीय वर्ग या दोघांच्या समन्वयाने नवनिर्मित विश्वशांती सरोवर, व्ही. सीए. रविवार, १६ एप्रिल २०२३ रोजी क्रिकेट स्टेडियमजवळील जामठा (वर्धा रोड) येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत अध्यात्मातून प्रशासनातील उत्कृष्टता या विषयावर प्रशासकांसाठी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

परिषदेची उद्दिष्टे: रोज नवनवीन समस्यांना सामोरे जाणाऱ्या प्रशासकांच्या जीवनात चिंता, तणाव आणि मानसिक अस्वस्थता वाढते. त्यामुळेच आयोजकांनी सुखी आणि शांत जीवनासाठी वरील विषयावर ही परिषद आयोजित केली आहे. ही महाराष्ट्र राज्यस्तरीय मेगा परिषद आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार, खाजगी विभाग, बँक प्रशासक, अधिकारी, व्यवस्थापक, कंपन्यांचे वर्ग , वर्ग अधिकारी असे सुमारे २५०० प्रतिनिधी या परिषदेत सहभागी होत आहेत.

संमेलनाचे उदघाटन श्री.चंद्रशेखर जी बावनकुळे, माजी ऊर्जा मंत्री व अध्यक्ष, भाजपा, महाराष्ट्रराज्य, प्रमुख पाहुणे श्री.प्रशांत नरनवरे, आयुक्त समाज कल्याण महाराष्ट्र, प्रमुख पाहुणे श्री.सुभाष आर.चौधरी, कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, विशेष अतिथी, डॉ. विपिन इटनकर, जिल्हाधिकारी, नागपूर, सन्माननीय अतिथी श्री राधाकृष्णन, आयुक्त, नागपूर महानगरपालिका, सन्माननीय अतिथी श्री अमितेश कुमार, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, श्री रंगनाथ नाईकडे प्रमुख वनसंरक्षक, प्रादेशिक, नागपूर परिमंडळ, श्री.संजयकुमार विद्यार्थी, मेजर जनरल, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी आदी उपस्थित राहणार आहेत.

# संविधान चौकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**नागपूर, दि. १४ एप्रिल :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२वी जयंती येथील संविधान चौकात उत्साहात साजरी करण्यात आली. अनुयायी, लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी बाबासाहेबांच्या पुतळयास अभिवादन केले. विभागीय आयुक्त कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयातही बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने येथील संविधान चौकातील बाबासाहेबांच्या पुतळयाला अभिवादन करण्यासाठी एकच गर्दी जमली होती. शहाराच्या विविध भागांतून अनुयायांच्या मिरवणुका येथे दाखल झाल्या. एक-एक अनुयायी बाबासाहेबांच्या पुतळयासमोर नतमस्तक होत होता. आमदार सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रवीण दटके, मोहन मते यांच्यासह महानगर पालिका आयुक्त राधाकृष्ण बी., अतिरीक्त आयुक्त राम जोशी, सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त सिद्धार्थ गायकवाड आदींनीही यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयास पुष्पअर्पण करून अभिवादन केले.

विभागीय आयुक्त कार्यालयातही डॉ बाबासाहेब आंबेडक यांची जयंती साजरी करण्यात आली. येथील सभाकक्षात आयोजित कार्यक्रमात उपायुक्त प्रदीप कुलकर्णी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. उपायुक्त चंद्रभान पराते, प्रभारी उपायुक्त दिपाली मोतियेळे यांच्यासह उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकारी सुजाता गंधे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनीहीप्रतिमेस पुष्पअर्पण करुन अभिवादन केले.

## लग्नाचे आमिष दाखवून शरीरसंबंध

**नागपूर, दि. १४ एप्रिल :** फेसबुकवरून ओळख झाल्यानंतर लग्नाचे आमिष दाखवून वर्षभर एका युवतीवर बलात्कार केल्याची घटना पाचपावली पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. पाचपावली पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. मुकेश शेखर इंदूरकर (३४,पाचपावली) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी मुकेशने तिला लग्नाचे आमिष दाखवून आपल्या घरी बोलावले. ती घरी आल्यावर त्याने जबरदस्तीने तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. आरोपीने सलग वर्षभर तिला लग्नाच्या भूलथापा देऊन तिच्यावर बलात्कार केला. त्यामुळे प्रगतीने पाचपावली पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पाचपावली पोलिसांनी आरोपी मुकेशला अटक केली आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मनपातर्फे अभिवादन

**नागपूर, दि. १४ एप्रिल :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि. १४ एप्रिल रोजी सकाळी मनपा मुख्यालयातील इमारतीच्या दालनात भारतीय संविधानाचे निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राला माल्यार्पण करून मनपाचे आयुक्त तथा प्रशासक श्री. राधाकृष्णन बी. यांनी अभिवादन केले. याप्रसंगी मनपाचे अतिरिक्त आयुक्त तथा स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अजय गुल्हाने, अतिरिक्त आयुक्त श्री. राम जोशी, मुख्य अभियंता श्री.राजीव गायकवाड, उपायुक्त श्री. रवींद्र भेलावे, उपायुक्त श्री.प्रकाश वराडे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे संचालक श्री. महेश धामेचा, सहायक आयुक्त श्री. विजय हुमने, शिक्षणाधिकारी श्री. राजेंद्र पुसेकर, उपमुख्य अग्निशमन अधिकारी श्री.बी.पी. चंदनखेडे उपस्थित होते. यानंतर आयुक्तांनी नागपुरातील संविधान चौकामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त तथा स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजय गुल्हाने व अतिरिक्त आयुक्त श्री. राम जोशी उपस्थित होते.



मनपा आयुक्तांनी नागपूरकरांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, बाबासाहेबांनी आपल्यासाठी तयार केलेले संविधान सर्वोत्तम असून आपण सगळ्यांना त्याचा लाभ मिळत आहे. समाजाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी आणि सर्वजण समानतेने कसे राहू शकतील यासाठी बाबासाहेबांनी कार्य केले आहे.

## बसपा ने आंबेडकर जयंती व बसपा स्थापना दिवस साजरा केला

**नागपूर, दि. १४ एप्रिल :** संविधानाचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा १३२ वा जन्मदिन दिवस व बहुजन समाज पार्टीचा ३९ वा स्थापना दिवस (१४ एप्रिल १९८४) बसपाच्या नागपुरातील विभागीय प्रदेश कार्यालयात व संविधान चौकात साजरा करण्यात आला.

बसपाचे नागपूर जिल्हाध्यक्ष संदीप मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या जयंती व पक्ष स्थापना दिन कार्यक्रमात महाराष्ट्र प्रदेश बसपाचे महासचिव नागोराव जयकर, मा प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, जिल्हा प्रभारी प्रा सुनील कोचे, शहर प्रभारी विकास नारायणे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा महासचिव प्रताप सूर्यवंशी यांनी तर समापन जिल्हा सचिव अभिलेश वाहने यांनी केला.

देशात महात्मा फुलेंच्या भाषेतील प्रस्थापित ब्राह्मण-बनियाच्यापार्ट्या आहेत. बसपा हीच एकमेव बहुजनांची प्रथम क्रमांकाची व राष्ट्रीय स्तरावरील तिसऱ्या क्रमांकाची राजकीय पार्टी आहे. त्यामुळे बहुजनांनी संविधान व देश रक्षणासाठी विनाविलंब बसपा चा स्वीकार करावा असे आवाहन याप्रसंगी बसपा नेत्यांनी केले.

कार्यक्रमाला प्रामुख्याने माजी जिल्हाध्यक्ष विलास सोमकुवर, माजी नगरसेवक इब्राहिम टेलर, प्रा किरण कुमार पाली, तपेश पाटील, मनोज गजभिये, श्रीकांत बडगे, बुद्धम राऊत, नितीन वंजारी, अंकित थुल, राजरत्न कांबळे, दीपक खंडाळे, रामराव निकाळजे आदी प्रमुख कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

## दर्जेदार अग्निशमन सुरक्षा सेवा देण्यास मनपा कटिबद्ध

### मनपा प्रशासक तथा आयुक्त राधाकृष्णन बी : अग्निशमन सेवा दिन साजरा

**नागपूर, दि. १४ एप्रिल :** अहोरात्र जीवाची पर्वा न करता शहर आणि शहरातील नागरिकांच्या सुरक्षेचे कार्य अग्निशमन विभाग सातत्याने करत आले आहे. या कार्यात अनेकांना आपल्या प्राणाची बाजी देखील लावावी लागली आहे. शहर वाढत असताना विभागाची जबाबदारी सुद्धा वाढत आहे. नागपूर शहरातील प्रत्येक नागरिकास दर्जेदार अग्निशमन सुरक्षा सेवा प्रदान करण्यास नागपूर महानगरपालिका कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन मनपा प्रशासक तथा आयुक्त श्री. राधाकृष्णन बी. यांनी केले.



अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागातर्फे अग्निशमन सेवा सप्ताहाच्या अनुषंगाने शुक्रवारी (ता. १४) मनपा मुख्यालयातील हिरवळीवर अग्निशमन सेवा दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. मंचावर अतिरिक्त आयुक्त तथा नागपूर स्मार्ट अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अजय गुल्हाणे, अतिरिक्त आयुक्त श्री. राम जोशी, मुख्य अभियंता राजीव गायकवाड, उपायुक्त श्री. रवींद्र भेलावे, उपायुक्त श्री. प्रकाश वराडे, उपमुख्य अग्निशमन अधिकारी श्री.बी.पी. चंदनखेडे उपस्थित होते. याप्रसंगी माहिती तंत्रज्ञान विभागाचे संचालक श्री. महेश धामेचा, सहायक आयुक्त श्री. विजय हुमने, शिक्षणाधिकारी श्री. राजेंद्र पुसेकर आदींची उपस्थिती होती.

## अंध युवकांची डॉ.बाबासाहेबांना ब्रेल लिपीतून आदरांजली

**नागपूर, दि. १४ एप्रिल :** अंध युवक-युवतींनी मानवी हक्कांची परतफेड भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोख्या पद्धतीने केली आहे. या अंध युवक-युवतींनीआपल्या प्रज्ञाचक्षूंच्या प्रकाशात भारतीय संविधान ब्रेल लिपीमध्ये तयार केले आहे. भारतीय संविधान सर्वच प्रकारच्या लिपींमध्ये उपलब्ध झाले आहे.



भारतीय संविधानाला विश्वातील मानवी हक्कांचा बेजोड नुमना म्हणून ओळखले जाते. प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील सर्व राज्यघटनांचा अभ्यास करून परिश्रमपूर्वक भारतीय राज्यघटना तयार केली आहे. भारतीयांनी तिचा स्वीकार दि. २६ नोव्हेंबर १९४९रोजी केल्यानंतर विविध भाषांमध्ये उपलब्ध करण्यात आले. मात्र, ज्यांना संविधानाने मानवी हक्क दिले, त्या ज्यांना दृष्टीच नाही अशा अंध बांधवांना संविधानातील तरतुदीचा लाभ मिळत असला तरी संविधानाच्या प्रत्यक्ष तरतुदीचा स्वानुभव घेण्यापासून मात्र ते आजपर्यंत वंचितच राहीले. यापूर्वी तसा प्रयोग स्वागत थोरात यांनी केला. मात्र, त्याचा फारसा प्रसार झालेला नाही. हे लक्षात घेऊन ठाणे येथील अस्तित्व फाऊंडेशनच्या प्रियंका झाल्टे यांनी आपल्या संस्थेच्या माध्यमातून हा प्रकल्प हाती घेतला आणि तो पूर्णत्वाला नेला.

# रविवारी नागपुरात होणार व्हॉईस ऑफ मीडियाचे अधिवेशन

### विदर्भाच्या ११ जिल्ह्यातील सुमारे ८०० हून पत्रकार होतील सहभागी

**नागपूर, दि. १४एप्रिल :** पत्रकार आणि पत्रकारितेसाठी कृतिशील उपक्रम राबविणारी व्हॉईस ऑफ मीडिया'ही संघटना देशातील पत्रकारांसाठी हक्काची चळवळ बनली आहे. संघटनेचा विस्तार वेगाने होत आहे. अवघ्या दोन वर्षांत देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेल्या 'व्हॉईस ऑफ मीडियाचे जाळे २८ राज्यात व सर्व केंद्रशासित प्रदेशात पसरले आहे. संघटनेने २६ हजार सभासदांचा टप्पा पार केला आहे. या संघटनेचे विदर्भ विभाग अधिवेशन रविवार, १६ एप्रिल २०२३ रोजी किंग्जवे ऑडिटोरिअम (परवाना भवन) कस्तुरचंद पार्कजवळ नागपूर येथे होत आहे.




विदर्भस्तरीय अधिवेशनाचे उद्घाटन दुपारी १२ वाजता केंद्रीय भूपृष्ठवाहतूक व महामार्ग मंत्री मा. ना. नितीन गडकरी यांच्या हस्ते होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हॉइस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे राहतील. यावेळी विशेष अतिथी म्हणून राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, शेतकरी नेते रविकांत तुपकर, मुख्य वक्ते म्हणून व्हॉइस ऑफ मीडियाचे केंद्रीय कार्याध्यक्ष संजय आवटे, प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रपूर विधानसभेचे आमदार किशोर जोरगेवार, व्हॉईस ऑफ मीडियाचे राज्याध्यक्ष राजा माने, प्रदेश अध्यक्ष अनिल म्हस्के यांची उपस्थिती राहील.

अधिवेशनात विदर्भातील सर्व जिल्हाध्यक्ष मनोगत आणि अहवाल सादरीकरण करतील. दुपारच्या दुसऱ्या सत्रात बदलती पत्रकारिता आणि आव्हाने यावर राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होत आहे. तिसऱ्या सत्रात व्हॉईस ऑफ मीडियाच्या विविध विंगचे प्रदेश अध्यक्ष मनोगत आणि सादरीकरण करतील.

पत्रकारांच्या समस्यांवर चर्चा, उपायांवर मंथन होईल. व्हॉईस ऑफ मीडियाची भूमिका, भविष्यातील उपक्रम आदींची माहिती देण्यात येईल. या कार्यक्रमात आपण सहभागी होऊन पत्रकारांच्या हक्कासाठीच्या चळवळीला बळ द्यावे, असे आवाहन व्हाईस ऑफ मीडियाचे विदर्भ अध्यक्ष मंगेश खाटिक, पालक सचिव (विदर्भ) संजय पडोळे, संयोजक तथा जिल्हा अध्यक्ष आनंद आंबेकर, शहर अध्यक्ष फहीम खान, जिल्हाध्यक्ष सर्वश्री लक्ष्मीकांत बगाडे (बुलढाणा), अमर घाटरे (अमरावती), नंदकिशोर परसावार (भंडारा), भागवत मापारी (वाशिम), प्रमोद नागनाथे (गोंदिया) आणि विदर्भ कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## पोलिसांना मारहाण, २ गजाआड

**नागपूर, दि. १४एप्रिल :** जुनी कामठी ठाण्यांतर्गत दोघांनी शासकीय कामात अडथळा निर्माण करीत पोलिसांना शिविगाळ आणि मारहाण केली. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे. तपासकुमार अनूपकुमार शर्मा (३७) रा. गोधनी आणि शुभम रमेश सोनकुसरे (२६) रा. पाचपावली अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

बुधवारी रात्री जुनी कामठी ठाण्याचे कॉन्स्टेबल फैजूर रहमान आणि आफाक परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान मदन चौकात भांडण सुरू असल्याची माहिती मिळाली. फैजूर यांनी भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला. मात्र तापस आणि शुभमने त्यांनाचा शिविगाळ करीत मारहाण सुरू केली.तत्काळ नियंत्रण कक्षाला माहिती देण्यात आली. दोन्ही आरोपींवर शासकीय कर्मचाऱ्यांना मारहाण आणि कामात अडथळा निर्माण केल्याचा गुन्हा नोंदवून अटक करण्यात आली.


## बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर

**ई-निविदा सुचना क्रमांक १६ सन २०२२-२०२३**
**व्दितीय मुदत वाढ (तिसरी फेरी)**

दिनांक:- २७/०३/२०२३

निविदेच्या अटि व शर्ती, निविदा फॉर्म, शुध्दीपत्रक व ईतर आवश्यक माहिती बांधकाम विभागाचे नोटीस बोर्डवर व http://mahatenders.gov.in वर उपलब्ध आहे.

(निविदेतील अटि व शर्तीचे वाचन करूनच निविदा फॉर्म भरावे.)

| अ. क्र | कामाचे नांव | चंद्रपूर जिल्हयातिल जि.प. बांधकाम विभागामार्फत राबविण्यात येणारे प्रस्तावित कामे एकूण - ७ |
|---|---|---|
| १ | ई-निविदा सुचना क्रमांक | सुचना क्रमांक १६ सन २०२२-२३ |
| २ | ई-निविदा सुचनेची उपलब्धतेचे स्थळ | http://mahatenders.gov.in नोटीस बोर्ड - बांधकाम विभाग जि.प. चंद्रपूर |
| ३ | ई- निविदा सादर करण्याची अंतीम दिनांक | दिनांक :- १२/०४/२०२३ ला सांयकाळी ०५.०० ते १९/०४/२०२३ ला सांयकाळी ५.०० वाजता पर्यंत. |
| ४ | ई- निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक २०/०४/२०२३ ला सायंकाळी ५.०० वाजता पासून किंवा सक्षम अधिकारी ठरवतील त्याप्रमाणे उघडण्यात येतील. |

कार्यकारी अभियंता (बांधकाम)
जिल्हा परिषद, चंद्रपूर.



एल&टी फायनान्स लिमिटेड
**नोंदणीकृत कार्यालय:** 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24-परागणा उत्तर.
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** नागपुर

L&T Financial Services

## तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रचना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 12.04.2023 नुसार (रुपयांमध्ये) | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. रमेश देवशी भाई टंक<br>2. विनीत रमेश टंक<br>3. गीता बेन धरसी भाई टंक | मालमत्तेचा पत्ता : निवासी अपार्टमेंट क्र. 102, व्यापत आहे सुपर बांधकाम क्षेत्रफळ 125.167 आणि बांधकाम क्षेत्रफळ 105.135 चौ.मी., 1ला मजला, इमारतीचे नाव 'हिमालया अॅकॉर्ड अपार्टमेंट', निट भाडेपट्टा भूखंड क्र. 6, अधिमापन 1670 चौ.मी. (17980 चौ.फू.) सोबत सदर भूखंडामध्ये 4.865% भाग आणि स्वारस्य, मौजे - पांढराबोडी, विभाग क्र. 8, चालता क्र. 65, शहर सर्वेक्षण क्र. 898, शीट क्र. 7/13 कॉर्पोरेशन घर क्र. 665/ए/15, प्रभाग क्र. 70, नवाब लेआऊट, टिळक नगर, नागपुर अमरावती रोड, मौ. पांढराबोडी, नागपुर, महाराष्ट्र, नागपुर भारत 440018, नागपुर महानगरपालिका आणि नागपुर इम्प्रूव्हमेंट ट्रस्टच्या हद्दीमध्ये, नागपुर, तहसील आणि जि. नागपुर आणि हे खालीलप्रमाणे सीमाबद्ध आहे :<br>सीमारेषा :<br>पूर्व - अपार्टमेंट क्र. 101<br>पश्चिम - भूखंड क्र. 5<br>उत्तर - अमरावती रोड<br>दक्षिण - अपार्टमेंट क्र. 104 | NGPHL16000507 & NGPHL20000087 & NGPHL16000531 | 9 फेब्रुवारी 2023 | रु. 12,76,220.40/- | रु. 1,55,09,037.53/- | रु. 1,27,62,204/- | 26/04/2023 | 04/05/2023 |

### सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **02/05/2023** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **04/05/2023** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **06/05/2023** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे **नाव : शेखर काळे, एल अँड टी फायनान्स लि. - ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098 आणि अंकित विग, संपर्क क्र. 8668943242, एल अँड टी फायनान्स लि, ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुर्दीनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 15.04.2023
ठिकाण: नागपुर

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड